ePaper
राज्यात एक लाख कोटींची गुंतवणूक; विविध क्षेत्रांत 47 हजार रोजगार निर्मिती
| वर्ष - 9 | अंक -22 | UDYAM-MH-26-0158827 |



महाईन्यूज ™

## आतील पानांत

- बांगलादेशची विजयी सलामी!
- आशिया चषकात मिळाली नाही संधी
- भारताशी व्यापार करार करणार नाही?
- सगळे सडके आंबे आत्ताच बाहेर फेका

www.mahaenews.com | शुक्रवार, दि. 12 सप्टेंबर 2025 | पुणे, पिंपरी-चिंचवड आवृत्ती | mahaenews.com | लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!

**हैदराबाद गॅझेट** विनीत धोत्रे : "मराठा समाजाच्या आरक्षणाला नाही, पण जीआरला विरोध"

# जीआर विरोधात याचिका दाखल!

## सरकारची ठाम भूमिका; "सरसकट आरक्षण नाही, कोर्टात योग्य भूमिका मांडू", फडणवीस

| मुंबई | प्रतिनिधी |
महाईन्यूज

**हैदराबाद गॅझेटच्या जीआरविरोधात हाय कोर्टात याचिका दाखल करण्यात आली आहे, यावर आता मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची पहिली प्रतिक्रिया समोर आली आहे. मनोज जरांगे पाटील यांच्या आंदोलनानंतर सरकारने राज्यात हैदराबाद गॅझेट लागू करण्यासंदर्भात जीआर काढला आहे. मात्र आता मोठी बातमी समोर येत आहे, ती म्हणजे या जीआरविरोधात मुंबई उच्च न्यायालयात दोन याचिका दाखल करण्यात आल्या आहेत. हैदराबाद गॅझेटियरच्या अंमलबजावणीला मान्यता देणाऱ्या राज्य सरकारच्या अधिसूचनेला या याचिकांद्वारे आव्हान देण्यात आलं आहे. शिव अखिल भारतीय वीरशैव युवक संघटना आणि व्यवसायाने वकील असलेले विनीत धोत्रे यांच्या वतीनं या दोन याचिका हाय कोर्टात दाखल करण्यात आल्या आहेत.**



दरम्यान हैदराबाद गॅझेट लागू करण्यासंदर्भात जो जीआर काढण्यात आला होता, त्याविरोधात या याचिका दाखल करण्यात आल्यानं, यावर हाय कोर्ट आता काय निर्णय घेणार हे पहाणं महत्त्वाचं ठरणार आहे, या याचिकांवर सोमवारी सुनावणी होणार आहे. त्यावर आता मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची पहिली प्रतिक्रिया समोर आली आहे.

### नेमकं काय म्हणाले फडणवीस?

मराठा आरक्षणासंदर्भात हैदराबाद गॅझेट लागू करावं, अशी मागणी मनोज जरांगे पाटील यांनी केली होती, त्यानंतर राज्यात हैदराबाद गॅझेट लाकू करण्यासंदर्भात राज्य सरकारनं जीआर काढला आहे, मात्र आता या निर्णयला हाय कोर्टात आव्हान देण्यात आलं आहे. यावर फडणवीस यांची पहिली प्रतिक्रिया समोर आली आहे. जीआरविरोधात हायकोर्टात दोन याचिका दाखल करण्यात आल्या आहेत, कोर्टात योग्य भूमिका मांडू, सरसकट आरक्षण दिलेलं नाही, असं देवेंद्र फडणवीस यांनी म्हटलं आहे.

### विनीत धोत्रे यांची प्रतिक्रिया

आमचा मराठा समाजाच्या आरक्षणाला विरोध नाही, पण ज्या पद्धतीने हा शासन निर्णय काढण्यात आला आहे, त्याला मात्र विरोध आहे. त्यामुळे आम्ही कोर्टात याचिका दाखल केली आहे. मराठा समाजाला पहिलंच इडब्लूएस आणि एसईबीसी आरक्षण आहे, तरी देखील या शासन निर्णयांची गरज का होती? असा आमचा सवाल आहे. मी काही राजकीय टिप्पणी करणार नाही, पण हा निर्णय चुकीचा आहे. त्यामुळे कोर्टात याचिका दाखल केली असल्याचं धोत्रे यांनी म्हटलं आहे.

छगन भुजबळांनी दाखवली जीआरमधील ती मोठी चूक, जरांगे पाटलांचं टेन्शन वाढणार, आरक्षणाबाबत मोठा दावा

सध्या राज्यात मराठा आरक्षणाचा मुद्दा चांगलाच तापला आहे, सरकारने जीआर काढल्यानंतर आज छगन भुजबळ यांनी पत्रकार परिषद घेऊन मराठा आरक्षणाबाबत मोठा दावा केला आहे.मराठा आरक्षण आंदोलक मनोज जरांगे पाटील यांच्या मुंबईतील आंदोलनाला मोठं यश आलं, सरकारने राज्यात हैदराबाद गॅझेट लागू करण्यासंदर्भातील जीआर काढला, तसेच जरांगे पाटील यांच्या अन्य काही मागण्या देखील मान्य करण्यात आल्या आहेत. मात्र आता सरकारच्या या जीआरला ओबीसी समाजामधून जोरदार विरोध होत आहे. ओबीसी समाज चांगलाच आक्रमक झाला आहे. मराठा समाजाला ओबीसीमधून आरक्षण नको, त्यांना स्वतंत्र्य आरक्षण द्या, अशी ओबीसी समाजाची भूमिका आहे. सरकारने काढलेल्या जीआरच्या पार्श्वभूमीवर आज ओबीसी नेते छगन भुजबळ यांची पत्रकार परिषद पार पडली, या पत्रकार परिषदेमध्ये बोलताना त्यांनी मोठा दावा केला आहे.




## नेमकं काय म्हणाले भुजबळ?

आज भुजबळ यांची पत्रकार परिषद पार पडली, या पत्रकार परिषदेमध्ये बोलताना त्यांनी मोठा दावा केला आहे. मराठा समाज मागास नाही असं कोर्टानं म्हटलं आहे. प्रतिज्ञापत्रावरून मराठ्यांना ओबीसीत टाकता येत नाही. जाणूनबुजून खोटे प्रमाणपत्र दिले जात आहेत, जरांगेंनी पात्र शब्द काढायला लावला, दुसऱ्या जीआरमधून शब्द काढला. जरांगे म्हणाले मी स्वत: जीआर करून घेतला आहे, असं यावेळी भुजबळ यांनी म्हटलं

दरम्यान पुढे बोलताना त्यांनी या जीआर संदर्भात मोठा दावा केला आहे. हा जीआर मंत्रिमंडळासमोर न ठेवता, हारकती व सूचना न मागवता, शिवाय इतर मागासवर्गीय समाजाच्या विरोधाकडे दूर्लक्ष करून हा जीआर काढण्यात आला आहे. सध्या स्थितीमध्ये ओबसीमध्ये साडतीनशे पेक्षा अधिक जातींचा समावेश आहे, त्यामुळे त्यांच्या हक्कांवर गदा येऊ शकते. या जीआरमध्ये मराठा समाज असा शब्द प्रयोग करण्यात आला आहे, प्रत्यक्षात मराठा समाज आणि कुणबी या दोन भिन्न जाती आहेत, हे महाराष्ट्र शासनाने देखील मान्य केलं आहे. कुणबींना ओबीसीमधून आरक्षण तर मराठा समाजाला आर्थिक आणि शैक्षणिक आरक्षण असं ठरवण्यात आल्याचा दावा भुजबळ यांनी केला आहे. दरम्यान आता भुजबळ यांनी केलेल्या या दाव्यानंतर पुन्हा एकदा वातावरण तापण्याची शक्यता आहे.

**घरे बांधण्याचे नियोजन**

## 'म्हाडा'चे सभापती आढळराव पाटील यांची माहिती

# जिल्ह्यात 35 हजार घरे बांधण्याचे नियोजन

## २५ एकर जागा उपलब्ध होणार

। मुंबई ।

प्रतिनिधी : महाईन्यूज

**जिल्ह्यात म्हाडाच्या वतीने ३५ हजार घरे बांधण्याचे नियोजन करण्यात आले आहे. त्यानुसार पंधरा हजार घरांसाठी खेड आणि मुळशी तालुक्यातील जमीन उपलब्ध झाली आहे. सरकारी आणि खासगी जागांवर या घरांची उभारणी करण्यात येणार असल्याची माहिती म्हाडा पुणे विभागाचे सभापती शिवाजीराव आढळराव पाटील यांनी दिली.**



आढळराव म्हणाले, 'पुणे शहराजवळील पाबळ (ता. शिरूर) येथे २५ एकर जागा उपलब्ध होणार असून, खराबवाडी (ता. खेड) येथील घरांसाठी आराखडा अंतिम करण्यात आला आहे. शिरूर येथेही ४ एकर जागेत नवीन योजना सुरू करण्यात येणार आहे. खेड तालुक्यातील रोहकल येथे ४० ते ४५ एकर जागा उपलब्ध झाली असून, ९ ते १० हजार घरे तेथे बांधण्यात येतील.मुळशी तालुक्यातील नेरे येथे ८ ते ९ एकर जागा हाती आली असून, त्या ठिकाणी ५ हजार घरांचे नियोजन आहे. भोर येथे १२ एकर खासगी जागा उपलब्ध असून, बाजारभावाने या जागेची खरेदी करण्याची म्हाडाची तयारी आहे. महापालिका, नगर परिषद आणि नगर पंचायतींच्या हद्दीत परवडणाऱ्या दरात जागा उपलब्ध झाल्यास ती खरेदी करण्यात येईल, असे आढळराव यांनी स्पष्ट केले.म्हाळुंगे येथील म्हाडाच्या योजनेतील घरे पडून आहेत. 'प्रथम येणाऱ्यास प्रथम प्राधान्य' ही योजना राबवूनही त्याला प्रतिसाद मिळत नाही. या ठिकाणी असलेल्या रस्त्याची अडचण दूर करण्यात आली आहे. त्यानुसार रस्त्याचे काम येत्या काही दिवसांत सुरू करण्यात येणार आहे. येथील घरांच्या विक्रीसाठी खासगी यंत्रणांची मदत घेण्यात येणार आहे. सध्या या ठिकाणची ५० घरे भाडेतत्त्वावर देण्यात आली आहेत. तर ताथवडे येथील जागेवरील पहिल्या टप्प्यामधील ६८९ घरांपैकी २८ घरे अद्याप शिल्लक आहेत. तर फेज दोनमधील ७९२ घरांच्या विक्रीची प्रक्रिया सुरू आहे. याची किंमत ७४ लाखांवरून ६८ लाख करण्यात आली आहे.आढळराव म्हणाले, 'पुणे शहराजवळील पाबळ (ता. शिरूर) येथे २५ एकर जागा उपलब्ध होणार असून, खराबवाडी (ता. खेड) येथील घरांसाठी आराखडा अंतिम करण्यात आला आहे. शिरूर येथेही ४ एकर जागेत नवीन योजना सुरू करण्यात येणार आहे. खेड तालुक्यातील रोहकल येथे ४० ते ४५ एकर जागा उपलब्ध झाली असून, ९ ते १० हजार घरे तेथे बांधण्यात येतील.मुळशी तालुक्यातील नेरे येथे ८ ते ९ एकर जागा हाती आली असून, त्या ठिकाणी ५ हजार घरांचे नियोजन आहे. भोर येथे १२ एकर खासगी जागा

### १० हजार घरे तेथे बांधण्यात येतील

त्या ठिकाणी ५ हजार घरांचे नियोजन आहे. भोर येथे १२ एकर खासगी जागा उपलब्ध असून, बाजारभावाने या जागेची खरेदी करण्याची म्हाडाची तयारी आहे. महापालिका, नगर परिषद आणि नगर पंचायतींच्या हद्दीत परवडणाऱ्या दरात जागा उपलब्ध झाल्यास ती खरेदी करण्यात येईल, असे आढळराव यांनी स्पष्ट केले.म्हाळुंगे येथील म्हाडाच्या योजनेतील घरे पडून आहेत. 'प्रथम येणाऱ्यास प्रथम प्राधान्य' ही योजना राबवूनही त्याला प्रतिसाद मिळत नाही.

उपलब्ध असून, बाजारभावाने या जागेची खरेदी करण्याची म्हाडाची तयारी आहे. महापालिका, नगर परिषद आणि नगर पंचायतींच्या हद्दीत परवडणाऱ्या दरात जागा उपलब्ध झाल्यास ती खरेदी करण्यात येईल, असे आढळराव यांनी स्पष्ट केले.म्हाळुंगे येथील म्हाडाच्या योजनेतील घरे पडून आहेत. 'प्रथम येणाऱ्यास प्रथम प्राधान्य' ही योजना राबवूनही त्याला प्रतिसाद मिळत नाही. या ठिकाणी असलेल्या रस्त्याची अडचण दूर करण्यात आली आहे. त्यानुसार रस्त्याचे काम येत्या काही दिवसांत सुरू करण्यात येणार आहे. येथील घरांच्या विक्रीसाठी खासगी यंत्रणांची मदत घेण्यात येणार आहे. सध्या या ठिकाणची ५० घरे भाडेतत्त्वावर देण्यात आली आहेत. तर ताथवडे येथील जागेवरील पहिल्या टप्प्यामधील ६८९ घरांपैकी २८ घरे अद्याप शिल्लक आहेत. तर फेज दोनमधील ७९२ घरांच्या विक्रीची प्रक्रिया सुरू आहे. याची किंमत ७४ लाखांवरून ६८ लाख करण्यात आली आहे. जिल्ह्यात म्हाडाच्या वतीने ३५ हजार घरे बांधण्याचे नियोजन करण्यात आले आहे. त्यानुसार पंधरा हजार घरांसाठी खेड आणि मुळशी तालुक्यातील जमीन उपलब्ध झाली आहे. सरकारी आणि खासगी जागांवर या घरांची उभारणी करण्यात येणार असल्याची माहिती म्हाडा पुणे विभागाचे सभापती शिवाजीराव आढळराव पाटील यांनी दिली. (ता. खेड) येथील घरांसाठी आराखडा अंतिम करण्यात आला आहे. शिरूर येथेही ४ एकर जागेत नवीन योजना सुरू करण्यात येणार आहे.

# शहरातील वाहतुकीवर मोठा ताण येत आहे

## चांदणी चौक ते जांभूळवाडी रस्त्याचा 'डीपीआर' तयार करा

। मुंबई ।

प्रतिनिधी : महाईन्यूज

**पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाला (पीएमआरडीए) शहरातील चांदणी चौक ते जांभूळवाडी आणि जैन वसतिगृह बकोरी फाटा ते बकोरी या दोन्ही रस्त्यांच्या कामांचा सविस्तर प्रकल्प अहवाल (डिटेल प्रोजेक्ट रिपोर्ट- डीपीआर) तयार करण्याची सूचना करण्यात आली आहे. या दोन्ही रस्त्यांच्या भूसंपादनासाठी जमीनधारकांबरोबर येत्या काही दिवसांमध्ये बैठक घेण्यात येणार आहे.**



चांदणी चौक ते जांभूळवाडी, जैन वसतिगृह बकोरी फाटा ते बकोरी रस्ता, वाघोली ते केसनंद, वाघोली ते आव्हाळवाडी या रस्त्यांच्या कामासंदर्भात उपमुख्यमंत्री, जिल्ह्याचे पालकमंत्री अजित पवार यांच्या अध्यक्षतेखाली बैठक झाली. त्यावेळी महिन्याभरात डीपीआर करण्याची सूचना पवार यांनी पीएमआरडीएला केली.वित्त विभागाचे अपर मुख्य सचिव ओ. पी. गुप्ता, नियोजन विभागाचे प्रधान सचिव सौरभ विजय, उपमुख्यमंत्र्यांचे सचिव डॉ. राजेश देशमुख, सहसचिव

### रस्ता तातडीने करण्याचे निश्चित

मात्र नागरिकांची होणारी गैरसोय लक्षात घेता पीएमआरडीएकडून हा रस्ता तातडीने करण्याचेही या बैठकीत निश्चित करण्यात आले जांभूळवाडी आणि जैन वसतिगृह बकोरी फाटा ते बकोरी या दोन्ही रस्त्यांच्या कामांचा सविस्तर प्रकल्प अहवाल (डिटेल प्रोजेक्ट रिपोर्ट- डीपीआर) तयार करण्याची सूचना करण्यात आली आहे.

विकास ढाकणे, राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाचे प्रकल्प संचालक संजय कदम यावेळी उपस्थित होते. तर जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी, पीएमआरडीएचे महानगर आयुक्त डॉ. योगेश म्हसे, पुणे महापालिका आयुक्त नवल किशोर राम, शिरूरचे आमदार माऊल कटके दूरदृश्य संवाद प्रणालीद्वारे बैठकीस उपस्थित होते.वाढत्या नागरीकरणामुळे शहरातील वाहतुकीवर मोठा ताण येत आहे. सर्व यंत्रणांनी समन्वयाने काम करावे, असेही पवार यांनी स्पष्ट केले. वाघोली ते केसनंद आणि वाघोली ते आव्हाळवाडी हा रस्ता सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अंतर्गत येत आहे.

**महापौर पद आरक्षण** — अनुसूचित जातीचे आरक्षण पडण्याची शक्यता

# पिंपरीचे महापौर अनुसूचित जातीसाठी आरक्षित होणार?

## महापौर पद आरक्षण निश्चितीसाठी महापालिकेने शासनाला पाठविली माहिती

। पिंपरी चिंचवड ।
प्रतिनिधी : महाईन्यूज

**पिंपरी चिंचवड | प्रतिनिधी: महापालिका निवडणुकीसाठी प्रारूप प्रभागरचना प्रसिद्ध झाल्यानंतर हरकती, सुनावणी प्रक्रिया पूर्ण झाली आहे. त्यानंतर आता महापौरपदाच्या आरक्षण निश्चितीच्या प्रक्रियेला सुरुवात झाली असून, शहरातील लोकसंख्या, - महापौर आरक्षण लागू झाल्यापासूनचा आरक्षणाचा तपशील महापालिकेने राज्य - शासनाला पाठविला आहे.**




महापौरपदासाठी सर्व प्रवर्गासाठीचे आरक्षण झाले आहे. आता केवळ अनुसूचित जाती (एससी) चे आरक्षण राहिले आहे. त्यामुळे महापौरपदासाठी 'एससी'चे आरक्षण पडण्याची शक्यता वर्तविली जात आहे. महापालिकेवर मागील साडेतीन वर्षांपासून प्रशासकीय राजवट आहे. आयुक्तच प्रशासक म्हणून कामकाज करत आहेत. ऑक्टोबर महिन्याच्या पहिल्या आठवड्यात अंतिम प्रभागरचना प्रसिद्ध होणार आहे. राज्य शासनाने महापौर आरक्षण निश्चितीची प्रक्रिया सुरू केली आहे. आजपर्यंतच्या महापौरपदाच्या आरक्षणाचा प्रवर्ग, आरक्षणाचा कालावधी सुरू झाल्याची आणि आरक्षण संपुष्टात आल्याची माहिती मागविली. तसेच २०११च्या जनगणनेनुसार लोकसंख्येची माहिती राज्य शासनाने मागविली होती. त्यानुसार पालिकेने २००१ पासूनचा आरक्षणाचा तपशील नगरविकास खात्याकडे पाठविला आहे. महापौर आरक्षण लागू झालेल्या दिनांकापासून म्हणजेच सन २००१ पासून ते २०२२ पर्यंतच्या आरक्षणाचा तपशील पाठविला आहे. त्यामध्ये आरक्षणाचा जात प्रवर्ग, आरक्षण सुरू झालेल्याचा आणि संपुष्टात आलेल्याचा कालावधी, आजपर्यंतच्या महापौरांचे नाव आणि त्यांचा कालावधी तसेच २०११ची जनगणना, लोकसंख्येची माहिती, अनुसूचित जाती-जमातींची माहिती पाठविण्यात आली आहे. महापालिकेचे एकूण ३२ प्रभाग असून, नगरसेवकांची संख्या १२८ आहे. सन २०११ च्या जनगणनेनुसार शहराची १७ लाख २७ हजार ६९२ लोकसंख्या आहे.

> महापौरपदाच्या आरक्षण निश्चितीसाठीची माहिती शासनाने मागविली होती. त्यानुसार आजपर्यंतच्या महापौरपदाचा आरक्षण सुरू झालेल्याचा आणि संपुष्टात आलेल्याचा कालावधी, लोकसंख्येची माहिती पाठविली आहे.
> **-अविनाश शिंदे,** सहायक आयुक्त, निवडणूक विभाग, महापालिका

### महापौरपदाचे आजपर्यंतचे आरक्षण

पिंपरी-चिंचवडच्या महापौरपदी खुला प्रवर्ग, नागरिकांचा मागास प्रवर्ग (ओबीसी), अनुसूचित जमाती (एसटी) या प्रवर्गाच्या नगरसेवकांना संधी मिळाली आहे. त्यात प्रकाश रेवाळे (इतर मागास प्रवर्ग), मंगला कदम (महिला खुला प्रवर्ग), डॉ. वैशाली घोडेकर (नागरिकांचा मागास प्रवर्ग), अपर्णा डोके (नागरिकांचा मागास प्रवर्ग), योगेश बहल (खुला प्रवर्ग), मोहिनी लांडे (महिला खुला प्रवर्ग), शकुंतला धराडे (अनुसूचित जमाती), नितीन काळजे (नागरिकांचा मागास प्रवर्ग), राहुल जाधव (नागरिकांचा मागास प्रवर्ग), उषा ढोरे (महिला खुला प्रवर्ग) यांचा समावेश आहे. आता केवळ अनुसूचित जाती (एससी) चे आरक्षण राहिले आहे. त्यामुळे महापौरपदासाठी 'एससी'चे आरक्षण पडण्याची शक्यता वर्तविली जात आहे.

---

# ऑनलाइन मालमत्ता कर भरल्यास ४ टक्के सवलत!

## 30 सप्टेंबरपर्यंत मुदत; वेळेवर कर भरण्यासाठी प्रोत्साहन

। पिंपरी चिंचवड ।
प्रतिनिधी : महाईन्यूज

**पिंपरी चिंचवड| प्रतिनिधी: पिंपरी चिंचवड महापालिकेच्या कर आकारणी व कर संकलन विभागामार्फत ३० सप्टेंबर २०२५ पर्यंत ऑनलाइन मालमत्ता कर भरणाऱ्यांसाठी मालमत्ता करावर विशेष सवलत जाहीर करण्यात आली आहे. ज्या मालमत्ताधारकांनी अद्याप मालमत्ता कर भरला नाही, त्यांना ३० सप्टेंबरपर्यंत मालमत्ता कर ऑनलाइन भरून या सवलतीचा लाभ घेता येणार आहे.**




शहरातील विकासकामे, सुविधा व सेवांची अखंडित अंमलबजावणी करण्यासाठी नागरिकांनी वेळेवर कर भरणे अत्यंत आवश्यक आहे. त्यामुळे नागरिकांनी वेळेवर मालमत्ता कर भरावा, असे आवाहन सातत्याने महापालिकेच्या वतीने करण्यात येत असते. तसेच वेळेवर मालमत्ता कर भरणाऱ्यांसाठी विविध सवलती देखील जाहीर करण्यात येतात. आता महापालिकेने ३० सप्टेंबर २०२५ पूर्वी ऑनलाइन पद्धतीने मालमत्ता कर भरणाऱ्या मालमत्ताधारकांना चालू वर्षाच्या सामान्य करावर थेट ४ टक्के सवलत देऊ केली आहे. तरी जास्तीत जास्त मालमत्ताधारकांनी या सवलतीचा लाभ घ्यावा, असे आवाहन पिंपरी चिंचवड महापालिकेच्या वतीने करण्यात आले आहे.

**असा भरा ऑनलाइन कर**

पिंपरी चिंचवड महापालिकेच्या WWW.PCMCINDIA.GOV.IN संकेतस्थळाला भेट द्या. मुख्य पृष्ठावरील 'नागरिक' या पर्यायावर क्लिक करा आणि 'मालमत्ता कर विभाग' येथे जा.त्यानंतर मालमत्तेला जोडलेला मोबाईल क्रमांक किंवा मालमत्ता क्रमांक टाका. त्यानंतर तुमच्या मोबाईलवर एक ओटीपी (OTP) येईल. तो ओटीपी टाकल्यानंतर, 'बिल भरा' हा पर्याय निवडा आणि आपल्या मालमत्ता कराचे बिल सवलतीसह भरा.

> **मालमत्ता कर हा शहराच्या विकासाचा मुख्य आधार आहे. नागरिकांनी वेळेवर कर भरून केलेल्या सहकार्यामुळे महापालिकेला रस्ते, पाणी, आरोग्य, स्वच्छता अशा महत्त्वाच्या सेवांची अंमलबजावणी करण्यास मदत होते. ३० सप्टेंबर २०२५ पर्यंत मालमत्ता कर भरणाऱ्यांना दिली जाणारी ४ टक्के सवलत ही नागरिकांसाठी एक मोठी संधी आहे. जास्तीत जास्त नागरिकांनी ही संधी न गमावता ३० सप्टेंबरपूर्वी ऑनलाइन कर भरावा.**
> **—प्रदीप जांभळे पाटील,**
> **अतिरिक्त आयुक्त, पिंपरी चिंचवड महापालिका**

> **मालमत्ता कर भरणे ही केवळ जबाबदारी नसून शहराच्या प्रगतीला थेट हातभार आहे. नागरिकांनी थकबाकी न ठेवता वेळेत कर भरला, तर महापालिकेला सेवा अधिक सक्षमपणे देता येतात. त्यामुळे अद्याप ज्यांनी मालमत्ता कर भरलेला नाही, त्यांनी उशीर न करता त्वरित कर भरणा करावा.**
> **सहायक आयुक्त, पिंपरी चिंचवड महापालिका**
> **— अविनाश शिंदे,**
> **अतिरिक्त आयुक्त, पिंपरी चिंचवड महापालिका**

# गोवंशच आर्थिकदृष्ट्या फायदेशीर!




**भारतात अनादी काळापासून गोपालन केले जात आहे. भौगोलिक आणि नैसर्गिक परिस्थितीनुसार देशात विविध प्रकारचे गोवंश विकसित झाले. एकेकाळी गोधनाची संख्या कुटुंबाच्या समृद्धीचे प्रतीक मानली जात होती. स्वातंत्र्य मिळाल्यानंतर, तत्कालीन परिस्थितीचा विचार करून अधिक दूध देणाऱ्या संकरित (हायब्रिड) गोवंशावर भर देण्यात आला.**

ज्यामुळे भारत जागतिक दूध उत्पादनात प्रथम क्रमांकावर पोहोचला. मात्र, प्रतिव्यक्ती दूध उत्पादनात आपण अजूनही मागे आहोत. आता पुन्हा एकदा देशी गोवंशाकडे सकारात्मक दृष्टिकोन ठेवला जात आहे, कारण त्यात भौगोलिक परिस्थितीशी जुळवून घेण्याची क्षमता आहे. रोगप्रतिकारशक्ती उत्तम आहे आणि कमी खर्चात चांगले उत्पन्न देता येते. भारतात एकूण ५१ देशी गोवंश नोंदणीकृत आहेत आणि महाराष्ट्रात खिलार, डांगी, देवणी, लाल कंधारी, गवळाऊ यांसारख्या स्थानिक जाती आहेत, ज्यांचा विकास तेथील हवामान, पर्यावरण आणि गरजांनुसार झाला आहे. अलीकडेच कोकण कपिला आणि कठाणी या दोन जातींनाही मान्यता मिळाली आहे.खिलार: पश्चिम महाराष्ट्रातील सांगली, सातारा, सोलापूर आणि सीमाभागातील बेळगाव, विजापूर येथे आढळणारा हा गोवंश कमी पर्जन्यमान असलेल्या भागासाठी



योग्य आहे. हा गोवंश काटक आणि चपळ असून, पंधराव्या शतकापासून दळणवळण आणि शेतीच्या कामांसाठी वापरला जात आहे. छत्रपती शिवाजी महाराजांनीही या गोवंशाचा वापर केल्याचे उल्लेख आढळतात. गवळाऊ: वर्धा जिल्ह्यातील या गोवंशाचा उपयोग मराठ्यांनी डोंगराळ प्रदेशात सामान वाहून नेण्यासाठी केला. हा गोवंश काटक, चपळ आणि वेगाने धावणारा आहे. दुष्काळात कमी पाणी आणि निकृष्ट चारा खाऊनही तो दूध उत्पादन देऊ शकतो. बैलगाडी शर्यतींमध्ये याची विशेष मागणी असते.डांगी: नाशिक आणि ठाणे जिल्ह्यांमध्ये आढळणारा हा गोवंश जास्त पावसाच्या प्रदेशात तग धरतो. त्याच्या त्वचेखालील तेलाच्या ग्रंथींमुळे तो सततच्या पावसातही काम करू शकतो. त्याचे पाय मजबूत असल्यामुळे डोंगरदऱ्यांमध्ये आणि भातशेतीत काम करण्यासाठी तो उपयुक्त आहे.देवणी: मूळ लातूर जिल्ह्यातील देवणी तालुक्यात आढळणारा हा गोवंश, स्थानिक आणि गीर जातीच्या संकरातून विकसित झाला आहे. हा शेतीच्या कामांसाठी उपयुक्त असून, इतर जातींच्या तुलनेत जास्त दूध देतो. शुद्ध देवणी गाय एका वेतात १००० ते १२०० लिटरपर्यंत दूध देऊ शकते.लाल कंधारी: नांदेड, हिंगोली आणि बीड जिल्ह्यांत आढळणारा हा गोवंश शेतीच्या कामासाठी उत्कृष्ट मानला जातो. त्याचे दूध उत्पादन कमी असले तरी, त्याची उत्तम रोगप्रतिकारशक्ती आणि कमी व्यवस्थापन खर्चामुळे मराठवाड्यातील शेतकरी त्याला प्राधान्य देतात. कोकण कपिला: कोकण भागातील ठाणे, रायगड, सिंधुदुर्ग, रत्नागिरी आणि पालघर जिल्ह्यांत आढळणारा हा गोवंश कमीत कमी खर्चात जगू शकतो. हा उष्ण हवामान सहज सहन करतो आणि कुटुंबाची रोजची दुधाची गरज पूर्ण करतो.कठाणी: नुकताच प्रमाणित झालेला हा गोवंश चंद्रपूर, गोंदिया आणि गडचिरोली जिल्ह्यांत आढळतो. चांगल्या गुणवत्तेच्या दुधासाठी ही जात ओळखली जाते आणि उष्ण हवामानाशी जुळवून घेण्यास ती सक्षम आहे.महाराष्ट्रातील देशी गोवंश स्थानिक परिस्थितीशी जुळवून घेणारे आणि शेतीच्या कामासाठी अत्यंत उपयुक्त आहेत. तथापि, वाढलेले यांत्रिकीकरण, कमी होत चाललेली जमीन आणि चराऊ कुरणांच्या अभावामुळे त्यांची संख्या झपाट्याने घटत आहे. गेल्या २२ वर्षांत देशी जनावरांची संख्या ४० टक्क्यांनी कमी झाली आहे, ज्यामुळे त्यांच्या संवर्धनाची तातडीची गरज निर्माण झाली आहे.देशी गोवंशाच्या संवर्धनासाठी काही महत्त्वाच्या उपाययोजना करणे आवश्यक आहे. प्रथम, त्यांच्या दूध उत्पादन, रोगप्रतिकारशक्ती आणि इतर गुणांविषयी अचूक माहिती संकलित करणे आवश्यक आहे. या सर्व देशी गोवंशाची नोंद इनाप या संगणकीय प्रणालीवर व्हायला हवी. त्यासाठी पशुपालकांनीदेखील सहकार्य करायला हवे. पशुसंवर्धन विभागाच्या अनुवंशिक सुधारणा कार्यक्रमाकडे संबंधितांनी लक्ष देणे अपेक्षित आहे. त्यामध्ये ज्या सुधारणा करणे आवश्यक आहे.

## संपादकीय »

# मगरमिठी!

***निवडणुकीत ट्रम्प यांच्या मागे तरुणांची फौजच्या फौज उभी करण्याच्या 'गुणा'मुळेच ट्रम्प यांच्या 'मागा' या मोहिमेचे चार्ली कर्क हे बिनीचे शिलेदार होते.***

अमेरिका इज द ओन्ली कंट्री दॅट वेंट फ्रॉम बार्बेरिझम टू डेकेडन्स विदाउट सिव्हिलायझेशन इन बिट्वीन," असे विख्यात लेखक ऑस्कर वाईल्ड अमेरिकेविषयी म्हणून गेले. त्याची प्रचीती गेले काही महिने येत असतानाच ताज्या घटनेत हे सत्य अधोरेखित झाले. चार्ली कर्क यांची हत्या हे ते सत्य. चार्ली ही कोणी साधी असामी नव्हे. चार्ली फक्त ३१ वर्षांचे होते आणि एका महाविद्यालयातील कार्यक्रमासाठी गेले असता दूरवरील इमारतीतून केल्या गेलेल्या गोळीबारात त्यांची हत्या झालीउलटे फिरवण्याचा ज्यांनी प्रयत्न केला, त्यातील एक महानुभाव म्हणजे चार्ली कर्क. साहजिकच त्यांच्या निधनाने अशा विचारसमूहाचे कुलपती अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांना धक्का बसला. म्हणूनच ख्रिस्ती धर्मगुरूंनी चार्लींच्या निधनाबद्दल तीव्र दुःख व्यक्त केले.

‘अरे, त्या नानासाहेब पेशव्यांकडे उत्तरेतून आलेल्या घाशीराम कोतवालशी माझी तुलना करता काय? काही जिभेला हाड तुमच्या? काहीही बोलाल काय? चला, घ्या सोडले राजकारण. तेही एका झटक्यात. आणि हो, व्यथित होऊन वगैरे नाही सोडले. अगदी ठरवून जाणीवपूर्वक घेतलाय मी हा निर्णय. आता वागा तुम्हाला जसे वागायचे असेल तसे.

# काय अडतंय राजकारणावाचून?

काहीसे बडबडत मोहितभाई दिवाणखान्यात येऊन बसले तेव्हा जलसंपदामधले काही कंत्राटदार त्यांची वाटच बघत होते. आज भाईंचा मूड काही चांगला नाही हे बघून त्यांनी आणलेल्या फाइली मांडीखाली दडवल्या. बसलेल्यांपैकी एकाचीही भाईंना काम सांगायची हिंमत झाली नाही.मग बैठकीतले मौन तोडत पुन्हा भाई सुरू झाले. ‘मी पक्का ‘बेपारी’ माणूस. तो करताना नफा-तोटा तर होणारच. तोटा झाल्याने नाही भरू शकलो बँकेचे हप्ते. निघाली जप्ती. गुन्हाही दाखल झाला. तेव्हा केवढा गजहब केला या पार्टीवाल्यांनी. शेवटी द्यावा लागला सर्व पदांचा राजीनामा. पण नेहमी कृपादृष्टी ठेवून असलेल्या साहेबांनी साथ सोडली नाही. पाठीवर हात ठेवत धीर दिला. एवढेच नाही तर पडद्याआडचे राजकारण सांभाळ असा सल्ला दिला. आपल्यासाठी काशीचे विश्वनाथ व साहेब सारखेच. दोघांवरही आपली तेवढीच श्रद्धा! त्यांच्यामुळेच पक्षात न राहतासुद्धा



आपली भरभराट झाली. शेवटी ‘फ्लेअर मॅनेजमेंट’ सांभाळण्यासाठी कुणीतरी लागतेच ना! या इथल्या गुळचट लोकांना ते जमत नाही त्याला मी काय करणार? तरीही माझा द्वेष करतात लेकाचे! म्हणून करून टाकली घोषणा राजकारण संन्यासाची. अरे, नसलो राजकारणात म्हणून काय झाले? आजही सत्तेच्या वर्तुळात वावरणारे सारेच मला सलाम करतात. माझ्याशिवाय पान हलत नाही कुणाचे. मग तो आमदार असो की मंत्री. कारण एकच. साहेबांनी टाकलेला विश्वास व मी दाखवलेली निष्ठा. राजकीय (आर्थिक नाही) व्यवहारात चोख राहिले की माणूस साऱ्यांनाच हवाहवासा वाटतो. तसा मी आहे व आयुष्यभर राहणार. कसलीही निवडणूक न लढता जर एवढा सन्मान मिळत असेल, सारे राजकारणी दरबारात हजेरी लावत असतील तर कशाला उगीच उमेदवारी मागण्याच्या फंदात पडायचे. उमेदवारीचे म्हणाल तर एका मिनिटात पाहिजे तिथून ती मिळवू शकतो मी. तेवढी वट आहे आपली. मुंबई आणि दिल्लीतही. आखीर पैसा बोलता है! पण मीच ठरवले. नकोच ते पडद्यासमोरचे राजकारण. साहेबांच्या आशीर्वादाने सुरू असलेला व्यवसायच बरा. निवडणूक आली की साहेब सांगतील तसे करायचे. विजय मिळाला की साहेबांना उचलून गुलाल उधळायचा. इतर कुणाचेही ‘बोज’ बनून राहायचे नाही. तशी आहे. इथल्या नेत्यांना ती जमत नसेल तर त्याला मी काय करणार? सुरुवातीला मला लक्षातच आले नाही हे घाशीराम प्रकरण. नंतर काही मराठी मित्रांकडून माहिती घेतली तेव्हा इतिहास कळला व चिडवतात का तेही कळले.

## ।। अभंगवाणी ।।



आजिवरी तुम्हां आम्हां नेणपण ।
कौतुकें खेळणें संग होता ॥१॥

आतां अनावर जालें अगुणाची ।
करूं नये तें चि करीं सुखें ॥२॥

**- संत तुकाराम**

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक-संपादक श्री. अधिकराव दिवे- पाटील** यांनी छत्रपती शिवाजी महाराज गोल मंडई, गाळा क्र. ७९/८०, संत तुकारामनगर, पिंपरी, पुणे- 411018 येथे पुणे विभागीय कार्यालयामधून प्रसिद्ध केले आहे. एमएसएमई नोंदणी क्रमांक : MH-26-0158827. या वृत्तपत्रात डिजिटल स्वरुपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक-संपादक सहमत असतीलच असे नाही.
**कार्यकारी संपादक : वैष्णव जाधव । मुख्य कार्यकारी संपादक : सुनील आढाव.** (*सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील) विशेष सूचना: हा अंक कोणत्याही प्रकारच्या प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.

विधेयकाची होळी

## महाविकास आघाडीची जोरदार निदर्शने

# जनसुरक्षा विधेयकाच्या प्रतीची होळी!

## कायद्याच्या प्रतीची होळी केली

। मुंबई ।
प्रतिनिधी : महाईन्यूज

**महाराष्ट्र जनसुरक्षा विधेयक विधिमंडळाच्या अधिवेशनात पाशवी बहुमताच्या जोरावर मंजूर करण्यात आले आहे. हे विधेयक घटनाविरोधी आणि लोकशाहीस बाधक असून जनतेच्या मूलभूत हक्कांवर गदा आणणारे असून ते रद्द करण्यात यावे, अशी आक्रमकपणे मागणी करत महाविकास आघाडीतील घटक पक्षांनी बुधवारी सातार्‍यातील पोवई नाक्यावर तीव्र आंदोलन केले. यावेळी आंदोलकांनी या कायद्याच्या प्रतीची होळीदेखील केली.**




राष्ट्रीय काँग्रेस, राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्ष, शिवसेना (उध्दव ठाकरे), भाकप, माकप, माकप (मा.ले.), समाजवादी पक्ष, स.क.प, भारिप, भारत जोडो अभियान, श्रमिक मुक्ती दल, जनआंदोलन संघर्ष समिती आणि जनसुरक्षा विधेयक विरोधी संघर्ष समिती या पक्ष संघटनांनी एकत्रित येत हे आंदोलन केले. काँग्रेस कमिटी येथे सर्व पक्षाचे पदाधिकारी, कार्यकर्ते एकत्रित जमले. तिथून पोवईनाक्यावरील शिवतीर्थापर्यंत मोर्चा काढला. छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळ्याला अभिवादन करून जनसुरक्षा विधेयकाचा जाहीर निषेध, महायुतीचे सरकार लोकशाहीला घाबरते, जनसुरक्षा विधेयक सत्ता शाबूत ठेवण्यासाठीच अशा निषेधाच्या घोषणा देण्यात आल्या.श्रमिक मुक्ती दलाचे संस्थापक डॉ. भारत पाटणकर, काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष रणजितसिंह देशमुख, राजकुमार पाटील, बाबुराव शिंदे, दिलीप बाबर, गोरखनाथ नलावडे, साहिल शिंदे, राजेंद्र शेलार आदींच्या प्रमुख उपस्थितीत हे आंदोलन करण्यात आले.यावेळी डॉ. भारत पाटणकर म्हणाले, हे विधेयक मंजूर करण्यापूर्वी विधिमंडळाच्या संयुक्त समितीकडे पाठविण्यात आले होते. या विधेयकाला प्रत्यक्ष व दिलेल्या संकेतस्थळावर सूचना व विरोध नोंदवण्यात आला आहे. राज्यभरातून तेरा हजार हरकती दाखल करण्यात आल्या. त्यापैकी साडेनऊ हजार हरकती हे विधेयक रद्द करावे, अशा मागण्यांसाठी आहेत.जुलमी सरकार सांविधानिक मार्गांनी सरकारला जाब विचारणारांना दडपून टाकू पाहत आहे. लोकसभा निवडणुकीत महाराष्ट्रातील सामाजिक कार्यकर्ते, विचारवंत, अभ्यासक, पत्रकार, यू ट्युबर्स, जाणते नागरिक यांनी भाजप व महायुती विरोधात व संविधान रक्षणासाठी जी ठाम भूमिका घेतली व महाविकास आघाडीला पाठिंबा दिला, त्या सर्वांना धडा शिकविण्यासाठी हा कायदा आणण्यात आला आहे. आता या कायद्याच्या विरोधात सामान्य, निडर नागरिकच उतरतील म्हणून या कायद्याच्या विरोधात राज्यभर आंदोलनाची हाक देण्यात आली आहे. यावेळी बाबुराव शिंदे यांचे भाषण झाले.बाबुराव शिंदे म्हणाले, की या विधेयकामध्ये नमूद केलेले बेकायदेशीर कृत्य म्हणजे जमावबंदीचा हुकूम मोडून शांततामय मोर्चा काढण्यापासून ते एखाद्या सरकारी कार्यालयाबाहेर उपोषणाचे, धरणे वा सत्याग्रहाचे शांततामय आंदोलनदेखील समाविष्ट होऊ शकेल. सरकारी यंत्रणेवरील टीका, सरकारी धोरणांवरील टीका, मंत्री, अधिकारी यांच्यावरील टीकाटिप्पणी ही देखील बेकायदेशी कृत्य ठरवले जाईल. विधेयक पटलावर ठेवताना मुख्यमंत्र्यांनी जी मांडणी केली, त्यातून हे उघड झाले आहे की राजकीय पक्षातील नेत्यांना ईडी, सीबीआयची तलवार टांगून दबावाखाली ठेवता येते. एमएमआरडीए, नैना, बल्क ड्रग्ज फार्मा पार्क, दिल्ली-मुंबई कॉरिडोर, जे. एस. डब्ल्यू यांसारख्या प्रकल्पांना विरोध करणे हेही बेकायदशीर कृत्य ठरू शकते. जनसुरक्षा विधेयक नसून फक्त सरकारमध्ये स्वत:च्या सत्तेच्या सुरक्षेसाठी आणलेले विधेयक असून त्याला विरोध करायलाच हवाले.), समाजवादी पक्ष, स.क.प, भारिप, भारत जोडो अभियान, श्रमिक मुक्ती दल, जनआंदोलन संघर्ष समिती आणि जनसुरक्षा विधेयक विरोधी संघर्ष समिती या पक्ष संघटनांनी एकत्रित येत हे आंदोलन केले.

### सर्व पक्षाचे कार्यकर्ते एकत्रित

काँग्रेस कमिटी येथे सर्व पक्षाचे पदाधिकारी, कार्यकर्ते एकत्रित जमले. तिथून पोवईनाक्यावरील शिवतीर्थापर्यंत मोर्चा काढला. छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळ्याला अभिवादन करून जनसुरक्षा विधेयकाचा जाहीर निषेध, श्रमिक मुक्ती दलाचे संस्थापक डॉ. भारत पाटणकर, काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष रणजितसिंह देशमुख, राजकुमार पाटील, बाबुराव शिंदे, दिलीप बाबर, गोरखनाथ नलावडे, साहिल शिंदे, राजेंद्र शेलार आदींच्या प्रमुख उपस्थितीत हे आंदोलन करण्यात आले.

# गुंतवणुकीसाठी महाराष्ट्र बनला आकर्षणकेंद्र

## सेवा क्षेत्रासह 14 क्षेत्रांसाठी धोरणे जाहीर होणार : मुख्यमंत्री फडणवीस

। मुंबई ।
प्रतिनिधी : महाईन्यूज

**महाराष्ट्र हे देशातील एक उद्योगस्नेही राज्य असून उद्योग आणि गुंतवणुकीसाठी सर्वोत्तम असल्याचे प्रतिपादन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी गुरुवारी येथे केले. जियो वर्ल्ड ट्रेड सेंटर येथे इंडिया-ऑस्ट्रेलिया बिझनेस अँड कम्युनिटी अलायन्स (आयएबीसीए) ग्लोबल फोरम लिडर्स मीट आणि सीईओंसोबत राऊंटटेबल कॉन्फरन्स वेळी मुख्यमंत्री बोलत होते.**



गुंतवणूकदार आणि उद्योजकांच्या राज्य शासनाकडून असलेल्या अपेक्षा पूर्ण करण्यासाठी तत्पर असल्याचे सांगून मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले की, राज्य शासन विविध क्षेत्रांविषयी नवीन धोरण आखत आहे. येत्या काळात १४ क्षेत्रांसाठीची धोरणे जाहीर होणार आहेत. त्यामध्ये सेवा क्षेत्राचा समावेश आहे. राज्याच्या आर्थिक प्रगतीमध्ये सेवा क्षेत्राचा मोठा वाटा आहे.उद्योजकांना गुंतवणूकदारांना अडचणी येऊ नयेत सर्व परवानग्या लवकर प्राप्त करता याव्यात या साठी मैत्री पोर्टल निर्माण करण्यात आले आहे. एक खिडकी योजना असून उद्योजकांना राज्यात गुंतवणूक करताना चांगला अनुभव यावा यासाठी प्रयत्नशील असल्याचेही त्यांनी सांगितले.इज ऑफ ड्युईंग बिझनेस मध्ये नव्याने सुधारणा करण्यात येत आहेत. गुंतवणुकीच्या नवीन संकल्पना राबवण्यात येत आहेत. राज्यात एक्सप्रेस वे चे जाळे उभारले जात आहे. संपूर्ण राज्यातील महत्त्वाची ठिकाणे सहा तासाच्या अंतराने वाढवण बंदराशी जोडली जात आहेत.राज्यात सांडपाणी व्यवस्थापन, त्यावरील प्रक्रिया, सौर ऊर्जा, पायाभूत सुविधा या क्षेत्रांमध्ये गुंतवणुकीच्या मोठ्या संधी आहेत.

### नवीन प्रकल्प उभारण्यात येत आहेत

या क्षेत्रातील गुंतवणुकीसाठी पुढाकार घ्यावा. पुणे येथे नवीन विमानतळ उभारण्यात येत आहे. त्यामुळे पुणे शहराच्या विकासाला आणखी गती मिळेल. पुण्यात जलद वाहतुकीसाठी पायाभूत सुविधांचे नवनवीन प्रकल्प उभारण्यात येत आहेत. सरकार उद्योग आणि गुंतवणूकदारांसाठी सकारात्मक निर्णय घेत असल्याचेही मुख्यमंत्री फडणवीस यांनी सांगितले.

अमेरिका व्यापार करार

## भारताला टॅरिफच्या मुद्यांवरून डिवचण्याचाही प्रयत्न

# भारताशी व्यापार करार करणार नाही?

। नवी दिल्ली ।
वृत्तसंस्था : महाईन्यूज

## अमेरिकन नेत्याचं मोठं विधान



**अमेरिकेच्या राष्ट्राध्यक्षपदाची दुसऱ्यांदा सूत्रे हाती घेतल्यानंतर डोनाल्ड ट्रम्प यांनी जगभरातील अनेक देशांवर मोठ्या प्रमाणात आयात शुल्क लादलं. तसेच रशियाकडून खजिन तेल खरेदी केल्याचा मुद्दा उपस्थित करत भारतावरही तब्बल ५० टक्के कराचं (टॅरिफ) ओझं टाकलं. तसेच डोनाल्ड ट्रम्प यांनी अनेकदा भारताला टॅरिफच्या मुद्यांवरून डिवचण्याचाही प्रयत्न केला. मात्र, डोनाल्ड ट्रम्प यांच्या दबावाला भारताने जुमानलं नाही आणि त्यानंतर डोनाल्ड ट्रम्प यांचा सूर बदलल्याचं पाहायला मिळत आहे.**

असं असतानाच आता अमेरिकेचे वाणिज्य सचिव हॉवर्ड लुटनिक यांनी पुन्हा एकदा भाष्य करत अमेरिका भारताशी व्यापार करार करणार की नाही? याविषयी स्पष्ट भूमिका मांडली आहे. हॉवर्ड लुटनिक यांनी पुन्हा एकदा संकेत दिले की भारताने रशियाकडून तेल खरेदी करणे थांबवल्यानंतरच भारताबरोबर अमेरिका व्यापार कराराच्या संदर्भाने पुढे जाऊ शकते. सीएनबीसीशी बोलताना हॉवर्ड लुटनिक यांनी हे भाष्य केल्याचं वृत्त इंडिया टुडेनी दिलं आहे."जेव्हा भारत रशियन तेल खरेदी करणे थांबवेल, तेव्हा आम्ही त्यांच्यासोबतच्या सर्व समस्या सोडवू. पण भारताने रशियन तेल आयात बंद करावी, त्यावरच पुढील प्रगती अवलंबून आहे", असं हॉवर्ड लुटनिक यांनी म्हटलं आहे. दरम्यान, व्यापार आणि ऊर्जा धोरणांवरून भारत आणि अमेरिकेमध्ये सुरू असलेल्या तणावानंतर लुटनिक यांचं हे विधान समोर आलं असून अमेरिका-भारत संबंधांमधील तणाव कमी होण्याची शक्यता मानली जात आहे. कारण काही दिवसांपूर्वी डोनाल्ड ट्रम्प यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना प्रिय मित्र असं संबोधलं होतं. त्यामुळे डोनाल्ड ट्रम्प हे देखील नरमले असल्याचं बोललं जात आहे. अमेरिकेच्या राष्ट्राध्यक्षांनी बुधवारी पहाटे त्यांच्या अधिकृत सोशल मीडिया अकाउंटवरून एक पोस्ट शेअर केली. या पोस्टमध्ये त्यांनी भारताशी पुन्हा एकदा व्यापाराची चर्चा आणि वाटाघाटी करण्यासंदर्भात सकारात्मकता दर्शवली. "पंतप्रधान नरेंद्र मोदी खूप चांगले मित्र आहेत. त्यांच्याशी बोलण्यासाठी मी उत्सुक असून, पुढील आठवड्यात आमची चर्चा होईल. मला खात्री आहे की, या दोन्ही महान देशांना निष्कर्षापर्यंत पोहोचण्यात कोणतीही अडचण येणार नाही", असं ट्रम्प यांनी त्यांच्या पोस्टमध्ये म्हटलं होतं. दरम्यान, विशेष बाब म्हणजे गेल्या आठवड्यातही व्हाईट हाऊसमध्ये बोलताना ट्रम्प यांनी भारतीय पंतप्रधानांचं कौतुक केलं होतं. "नरेंद्र मोदी हे महान

## मोदींनी प्रतिसाद दिला होता?

पुढील प्रगती अवलंबून आहे", असं हॉवर्ड लुटनिक यांनी म्हटलं आहे. दरम्यान, व्यापार आणि ऊर्जा धोरणांवरून भारत आणि अमेरिकेमध्ये सुरू असलेल्या तणावानंतर लुटनिक यांचं हे विधान समोर आलं असून अमेरिका-भारत संबंधांमधील तणाव कमी होण्याची शक्यता मानली जात आहे. कारण काही दिवसांपूर्वी डोनाल्ड ट्रम्प यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना प्रिय मित्र असं संबोधलं होतं. त्यामुळे डोनाल्ड ट्रम्प हे देखील नरमले.

पंतप्रधान असून, ते आपले नेहमीच चांगले मित्र राहतील. सध्या त्यांची भूमिका मला आवडत नसली तरी भारत आणि अमेरिकेचे संबंध चांगले राहतील", असंही ट्रम्प यांनी स्पष्ट केलं होतं.डोनाल्ड ट्रम्प यांनी भारताविरोधात नरमाईची भूमिका घेतल्यानंतर पंतप्रधान मोदींनीही त्यांच्या पोस्टला सकारात्मक प्रतिसाद दिला. "भारत आणि अमेरिका हे जवळचे मित्र असून, नैसर्गिक भागीदार आहेत. आमच्यातील व्यापार वाटाघाटींच्या चर्चेतून भारत-अमेरिकेमधील भागीदारीची अमर्याद क्षमता निर्माण होईल, असा मला विश्वास आहे. आमचे पथक लवकरच ही चर्चा पूर्ण करण्यासाठी काम करीत आहे. मी देखील राष्ट्राध्यक्ष ट्रम्प यांच्याशी बोलण्यास उत्सुक आहे. आम्ही आमच्या दोन्ही देशांतील लोकांचे उज्ज्वल आणि समृद्ध भविष्य सुरक्षित करण्यासाठी एकत्र काम करू. असं असतानाच आता अमेरिकेचे वाणिज्य सचिव हॉवर्ड लुटनिक यांनी पुन्हा एकदा भाष्य करत अमेरिका भारताशी व्यापार करार करणार की नाही? याविषयी स्पष्ट भूमिका मांडली आहे. हॉवर्ड लुटनिक यांनी पुन्हा एकदा संकेत दिले की भारताने रशियाकडून तेल खरेदी करणे थांबवल्यानंतरच भारताबरोबर अमेरिका व्यापार कराराच्या संदर्भाने पुढे जाऊ शकते. सीएनबीसीशी बोलताना हॉवर्ड लुटनिक यांनी हे भाष्य केल्याचं वृत्त इंडिया टुडेनी दिलं आहे."जेव्हा भारत रशियन तेल खरेदी करणे थांबवेल, तेव्हा आम्ही त्यांच्यासोबतच्या सर्व समस्या सोडवू.

# सगळे सडके आंबे आत्ताच बाहेर फेका

## काँग्रेसचे राष्ट्रीय अध्यक्ष मल्लिकार्जुन खरगे यांचं लक्षवेधी वक्तव्य

। नवी दिल्ली ।
वृत्तसंस्था : महाईन्यूज



**काँग्रेसचे राष्ट्रीय अध्यक्ष मल्लिकार्जुन खरगे यांनी गुजरात या ठिकाणी केलेलं भाषण आणि त्या भाषणातलं वक्तव्य चर्चेत आलं आहे. जुनागढ जिल्हा काँग्रेस अध्यक्षांच्या प्रशिक्षण शिबीरात ते म्हणाले पेटीतले सडके आंबे बाजूला करा नाहीतर आंब्याची सगळी पेटी खराब होईल. काँग्रेस पक्षाला नेमकं हेच केलं पाहिजे असंही त्यांनी म्हटलं आहे. त्यांच्या या वक्तव्यामुळे आता विविध चर्चांना उधाण आलं आहे.**

मल्लिकार्जुन खरगे गुजरातमधल्या काँग्रेसच्या कार्यकर्त्यांना आणि पदाधिकाऱ्यांना म्हणाले इंडियन एक्स्प्रेसमध्ये छापून आलेल्या एका अहवालाकडे नीट लक्ष द्या. यामध्ये सांगण्यात आलं आहे की पक्षाच्या ४१ पैकी १९ शहर आणि जिल्हा या ठिकाणी आपली पिछेहाट होते आहे. पक्षातले सडके आंबे बाहेर फेका. म्हणजे पूर्ण पेटी खराब होणार नाही. बूथ स्तरावर पक्ष मजबूत करा.

देशात लोकशाही वाचवायची असेल तर आपल्याला

## काँग्रेसची पिछेहाट होते आहे

मल्लिकार्जुन खरगेंनी ज्या रिपोर्टचा उल्लेख केला त्या रिपोर्टमध्ये ४१ पैकी १९ ठिकाणी काँग्रेसची पिछेहाट होते आहे. आत्ताच जे करायचं आहे ते करा. कारण आत्ताच आपल्याकडे वेळ आहे असंही खरगेंनी म्हटलं आहे. मूळापासून पक्ष मजबूत करा. शिबीरात पहिल्या दिवशी १०० टक्के उपस्थिती, दुसऱ्या दिवशी ९० टक्के उपस्थिती आणि तिसऱ्या दिवशी ८० टक्के उपस्थिती असं आता चालणार नाही.

काम करावं लागेल. अनुशासन, समर्पण, वैचारिकता या सगळ्या गोष्टींसह आपल्याला पुढे जायचं आहे.

गुजरातमध्ये जे काँग्रेस नेते तडजोडी करतात, ज्यांना चांगली कामगिरी करता येत नाही अशा लोकांना वेळीच बाजूला करा. आपल्याला आपला पक्ष गुजरातमध्ये मजबूत करावा लागेल. तुम्ही स्वतःमध्ये बदल करा, पक्ष आपोआप चांगल्या पद्धतीने उभा राहिल. गुजरातमध्ये काँग्रेसला आपली ताकद वाढवायची आहे असंही मल्लिकार्जुन खरगेंनी म्हटलं आहे.

# ‘ठरलं तर मग’ मालिका पुन्हा अव्वलस्थानी!

‘ठरलं तर मग’ मालिकेत अर्जुन-सायलीचं पुन्हा एकदा लग्न झालं असून, दोघंही सुभेदारांच्या घरात आपलं स्थान निर्माण करण्यासाठी प्रयत्न करत असल्याचं पाहायला मिळत आहे. अर्जुन-प्रियाच्या लग्नात सायली अचानक एन्ट्री घेते आणि आपल्याच नवऱ्याशी पुन्हा एकदा लग्न करते. मात्र, या लग्नापासून सुभेदार आनंदी नसतात. ते सायलीला घरातून हाकलून लावतात, तिचा गृहप्रवेश करत नाहीत. पण, अर्जुन तिला घरात घेऊन येतो. आपल्या बायकोला पुन्हा एकदा मानाचं स्थान मिळवून द्यायचं असा निश्चय अर्जुनने केलेला आहे. गेल्या काही दिवसांपासून ‘ठरलं तर मग’ मालिकेत नवनवीन ट्विस्ट आल्याचं पाहायला मिळालं. यामुळे प्रेक्षकांच्या मनात सुद्धा आता पुढे काय होणार याबद्दल उत्सुकता निर्माण झाली होती. याशिवाय आता ही मालिका अर्धा तास प्रसारित न करता रोज ८:१५ ते ९:०० अशी पाऊणतास प्रक्षेपित केली जाते. या सगळ्याचा सकारात्मक परिणाम मालिकेच्या टीआरपीवर झाला. ‘ठरलं तर मग’ मालिकेला पुन्हा एकदा रेकॉर्ड ब्रेकिंग टीआरपी मिळाला आहे. ‘ठरलं तर मग’ मालिका गेल्या काही आठवड्यांमध्ये टीआरपीच्या शर्यतीत दुसऱ्या स्थानी गेली होती. पण, मालिकेच्या टीमने भरपूर मेहनत घेऊन पुन्हा एकदा त्यांचं अव्वलस्थान पटकावलं आहे. ‘ठरलं तर मग’ मालिकेला गेल्या आठवड्यात ७ टीआरपी रेटिंग मिळालं आहे. सध्याच्या काळात टेलिव्हिजन मालिकेला ७ रेटिंग मिळणं ही मोठी गोष्ट आहे. त्यामुळे सर्व स्तरांतून ‘ठरलं तर मग’वर कौतुकाचा वर्षाव करण्यात येत आहे.

# विराट-अनुष्काला कॅफेमधून काढलं होतं बाहेर



टीम इंडियाचा रनमशीन विराट कोहली सध्या क्रिकेटच्या मैदानापासून दूर आहे. टी-२० आणि कसोटी क्रिकेटमधून निवृत्ती जाहीर केल्यानंतर विराट कुटुंबासह लंडनमध्ये स्थायिक झाला आहे. तेथील त्याचे काही व्हीडिओ, फोटो व्हायरल होत असतात. सोशल मीडियावरही विराट खूप कमी सक्रिय असतो. पण आता अचानक विराट पुन्हा चर्चेत आला आहे. भारतीय महिला क्रिकेटपटू जेमिमा रॉड्रिग्जने विराट आणि अनुष्काबद्दल एक धक्कादायक खुलासा केला आहे. भारतीय महिला क्रिकेटपटू जेमिमा रॉड्रिग्जने अलीकडेच खुलासा केला की विराट आणि अनुष्का यांना न्यूझीलंडमधील एका कॅफेमध्ये जास्त वेळ थांबल्यामुळे तिथून हाकलून लावण्यात आले होते. मॅशेबल इंडियाशी बोलताना तिने हा खुलासा केला.

# तुम नज़रें ठीक करो!



प्रसिद्ध अभिनेत्री हेमांगी कवी ही सोशल मीडियावर विविध पोस्ट शेअर करत असते. हेमांगीच्या 'बाई, बुब्स आणि ब्रा' या पोस्टनं अनेकांचे लक्ष वेधलं होते. हेमांगी विविध विषयांवर आधारित पोस्ट शेअर करत असते. आता हेमांगीनं जागतिक महिला दिनानिमित्त खास पोस्ट शेअर केली आहे. हेमांगीनं या पोस्टमध्ये स्वत:चा एक फोटो शेअर केला आहे. या फोटोमध्ये हेमांगी ही खिडकीच्या बाहेर दिसताना दिसत आहे. हेमांगीनं तिच्या या फोटोला खास कॅप्शन देखील दिलं आहे. या कॅप्शनमध्ये तिनं परीतोष त्रिपाठी यांची कविता लिहिली आहे. या कवितेनं अनेकांचे लक्ष वेधलं आहे.पुढे हेमांगीनं पोस्टमध्ये लिहिलं, "परीतोष त्रिपाठी जियो! कल के दौरान आपने ये पंक्तियां पेश की और मेरी आंखें भर आयी. इसमें वो हर एक शब्द है, है, जो मैं पिछले कुछ दिनों से कहना चाहती थी, जोर जोर से चिल्लाना चाहती थी! कुछ लोगों के लिए औरतों की किसी भी क्षेत्र में पायी गयी कोई मायने ही नहीं रखती. ऐसे लोग सिर्फ और सिर्फ उसने कपडे क्या पहने हैं, कैसे पहने हैं इस बात पर वक्त निकाल निकाल के बाते करते हैं, करते हैं, अपना और दुसरों का वक्त जाया करते हैं!के जरीए संस्कृती और सभ्यता के नाम पर हमें फिरसे गुलाम, कमजोर बनाना चाहते हैं!

# नम्रताने सांगितला ‘तो’ अनुभव

‘महाराष्ट्राची हास्यजत्रा’ कार्यक्रमातून आपल्या विनोदी शैलीने प्रेक्षकांची मनं जिंकणारी अभिनेत्री म्हणजे नम्रता संभेराव. नम्रताने आपल्या दमदार अभिनयाने प्रेक्षकांच्या मनात अढळ स्थान निर्माण केलं. आता ती वेगवेगळ्या चित्रपटात, नाटकात विविधांगी भूमिका साकारताना दिसत आहे. नुकतीच नम्रता संभेरावने सोशल मीडियावर एक पोस्ट शेअर केली आहे. ज्यामध्ये तिने ‘झी चित्र गौरव २०२५’चा सर्वोत्कृष्ट विनोदी अभिनेत्रीचा पुरस्कार मिळाल्यानंतरचा अनुभव लिहीला आहे. नम्रता संभेरावने पुरस्काराबरोबरचे काही फोटो शेअर करत लिहिलं आहे, “...आणि ते ‘झी चित्र गौरव’चं गाणं वाजलं माझ्यासाठी, सर्वोत्कृष्ट विनोदी अभिनेत्री नम्रता संभेराव चित्रपट ‘नाच गं घुमा’ त्या क्षणी पोटात गोळा आला. आनंद, सुख, समाधान सगळं एकवटून आलं. हे लहानपणी टीव्हीवर बघितलं होतं, कोणाला पारितोषिक मिळालं की डोळ्यात पाणी यायचं. मग ते अनोळखी असलं तरी आणि तो दिवस माझ्या आयुष्यात आला.”पुढे नम्रताने लिहिलं की, भरत जाधव सरांनी नाव पुकारलं नमु, अंगावर सरसरून काटा आला. विनोदाचे महारथी भरत जाधव सरांकडून मला पुरस्कार मिळाला, खूपच भारी वाटलं. समोर विनोदाचे बाप बसले होते, अशोक सराफ, सचिन पिळगांवकर, महेश कोठारे काय बोलावं साठवून ठेवावा असा क्षण. २० वर्ष झाली, सिने नाट्यसृष्टीत छोट्या मोठ्या भूमिका करत इथंवर पोहोचले. गर्दीतून हळूहळू अनेक अनुभवांसह शिकत स्वतःला पुढे ढकलत आज प्रमुख भूमिकेसाठी बक्षीस मिळवलं. प्रामाणिकपणे कलेवर प्रेम केलं, करत राहीन.“‘झी चित्र गौरव’च्या सर्व परीक्षकांचे मनापासून आभार. आशाच्या भूमिकेसाठी ज्यांनी माझ्यावर विश्वास ठेवला ते म्हणजे परेश मोकाशी, मधुगंधा कुलकर्णी या दोन अत्यंत हुशार हरहुन्नरी व्यक्तींनी. तुमचे सुद्धा खूप खूप आभार. मुक्ता ताई माझं प्रेरणास्थान तुझेही आभार. ‘नाच गं घुमा’च्या सगळ्या समूहाचे, निर्मात्यांचे मनापासून आभार. या सगळ्यात तुमचाही मोठा वाटा आहे आणि प्रेक्षकांचे देखील मनापासून आभार,” असं नम्रता संभेरावने लिहिलं.दरम्यान, नम्रता संभेरावच्या कामाबद्दल बोलायचं झालं तर, ती लवकरच प्रदर्शित होणाऱ्या प्रसाद खांडेकर दिग्दर्शित ‘चिकी चिकी बुबूम बुम’ चित्रपटात झळकणार आहे. २८ फेब्रुवारीला प्रदर्शित होणाऱ्या या चित्रपटात तिचा कॅमिओ असणार आहे. याशिवाय दुसऱ्या बाजूला तिच्या ‘थेट तुमच्या घरातून’ नाटकाला प्रेक्षकांचा चांगला प्रतिसाद मिळताना दिसत आहे. या नाटकात नम्रतासह प्रसाद खांडेकर, ओंकार राऊत, शिवाली परब, प्रथमेश शिवलकर आणि भक्ती देसाई आहे.‘महाराष्ट्राची हास्यजत्रा’ कार्यक्रमातून आपल्या विनोदी शैलीने प्रेक्षकांची मनं जिंकणारी अभिनेत्री म्हणजे नम्रता संभेराव. नम्रताने आपल्या दमदार अभिनयाने प्रेक्षकांच्या मनात अढळ स्थान निर्माण केलं.

# जिनिलीयाच्या व्हिडीओवर नेटकऱ्यांच्या प्रतिक्रिया

अभिनेता रितेश देशमुखव जिनिलीया देशमुख हे महाराष्ट्राचे लाडके दादा वहिनी आहेत. चाहते त्यांना दादा वहिनी असे म्हणताना दिसतात. या सेलेब्रिटी जोडप्याचा चाहतावर्ग मोठा आहे. चित्रपटांबरोबरच त्यांच्या सोशल मीडियावरील व्हिडीओंना प्रेक्षकांचे प्रेम मिळताना दिसते. ते अनेकदा विनोदी रीलमधून प्रेक्षकांचे मनोरंजन करतात. आता हे जोडपे एका रीलच्या माध्यमातून प्रेक्षकांच्या भेटीला आले आहेत. विशेष म्हणजे त्यांच्या या रीलवर अनेक चाहत्यांनी अनेक कमेंट केल्या आहेत. रितेश देशमुख व जिनिलीया देशमुख यांनी सोशल मीडियावर एक व्हिडीओ शेअर केला आहे. यावर लग्न म्हणजे काय? असे लिहिलेले दिसत आहे. जिनिलीया रितेशला म्हणते, “अहो लग्न म्हणजे काय हो?”, त्यावर रितेश म्हणतो, “अगं लग्न म्हणजे घोड्यावर बसून केलेला गाढवपणा”, या वाक्यानंतरच्या त्याच्या चेहऱ्यावरील हावभाव लक्ष वेधून घेत आहेत. तो घाबरल्याचे दिसत आहे. तर जिनिलीया त्याच्याकडे डोळे मोठे करून बघत असल्याचे दिसत आहे. शेवटी ‘काय मी बोलून गेलो’हे गाणे ऐकायला मिळत आहे. रितेश-जिनिलीयच्या या व्हिडीओवर चाहत्यांनी मजेशीर कमेंट केल्याचे पाहायला मिळत आहे.रितेश-जिनिलीयाच्या या व्हिडीओवर अनेक नेटकऱ्यांनी कमेंट्स केल्या आहेत. एका नेटकऱ्याने, “आता काही खरं नाही”, असे म्हणत हसण्याच्या इमोजी शेअर केल्या आहेत. दुसऱ्या एका नेटकऱ्याने कमेंट करीत लिहिले, “आजचा दिवस जाउद्या वाहिनी”, आणखी एका नेटकऱ्याने म्हटले, “आता सुट्टी नाही”, असे म्हणत हसणाऱ्या इमोजी शेअर केल्या आहेत. अनेक नेटकऱ्यांनी आणखी काही मजेशीर कमेंट केल्या आहेत. “भाऊ आज उपाशी झोपणार”, “दादाचं काही खर नाही हो आता”,”रितेश भाऊ जेवायला मिळतंय ना”, “दादा आता जेवण विसरा”, “आज जेवण मिळणार नाही”, “खतम टाटा बाय बाय”, अशा भन्नाट कंमेंट्स पाहायला मिळणार आहे.चाहत्यांसह काही कलाकारांनीदेखील यावर कमेंट केल्या आहेत. अभिनेत्री भाग्यश्रीने रितेश-जिनीलियाच्या व्हिडीओवर कमेंट करीत, “तुम्ही दोघे खूप क्यूट आहात”, असे म्हटले आहे. अभिनेत्रीने त्यांचे कौतुक केले आहे. तर सुयश टिळकने हसण्याच्या इमोजी शेअर केल्या आहेत. याबरोबरच, प्रसिद्ध युट्यूबर अर्थव सुदामेनेदेखील हसण्याच्या इमोजी शेअर केले आहेत.दरम्यान, आता रितेश देशमुख व जिनिलिया कोणत्या भूमिकेतून प्रेक्षकांच्या भेटीला येणार हे पाहणे महत्वाचे ठरणार आहे. अभिनेता रितेश देशमुखव जिनिलीया देशमुख हे महाराष्ट्राचे लाडके दादा वहिनी आहेत. चाहते त्यांना दादा वहिनी असे म्हणताना दिसतात. या सेलेब्रिटी जोडप्याचा चाहतावर्ग मोठा आहे. चित्रपटांबरोबरच त्यांच्या सोशल मीडियावरील व्हिडीओंना प्रेक्षकांचे प्रेम मिळताना दिसते.



हाँगकाँगवर दमदार विजय

## दासच्या अर्धशतकाच्या बळावर हाँगकाँगवर दमदार विजय

# बांगलादेशची विजयी सलामी!

## हाँगकाँगवर ७ गडी राखून विजय

। नवी दिल्ली ।
वृत्तसंस्था : महाईन्यूज

**आशिया चषक २०२५ स्पर्धेला दमदार सुरूवात झाली आहे. स्पर्धेतील तिसऱ्या सामन्यात हाँगकाँग आणि बांगलादेश हे दोन्ही संघ आमनसामने आले होते. या सामन्यात हाँगकाँगने बांगलादेशसमोर विजयासाठी १४४ धावांचे आव्हान ठेवले होते. या आव्हानाचा पाठलाग करताना बांगलादेशने ७ गडी राखून विजयाची नोंद केली आहे.**



या सामन्यात बांगलादेश संघाचा कर्णधार लिटन दासने नाणेफेक जिंकून प्रथम गोलंदाजी करण्याचा निर्णय घेतला. हाँगकाँगकडून प्रथम फलंदाजी करण्यासाठी आलेल्या झीशान अलीने ३० धावांची खेळी करून दमदार सुरूवात करून दिली. अंशुमन राठने ४ धावा केल्या. त्यानंतर बाबर हयातने १४ धावांचे योगदान दिले. मधली फळी सांभाळताना निझाकत खानने ४० चेंडूंचा सामना करत सर्वाधिक ४२ धावांची खेळी केली. तर कर्णधार यासीम मुर्तजाने २८ धावांचे योगदान दिले. यासह हाँगकाँगला २० षटकांअखेर ७ गडी बाद १४३ धावा करता आल्या.बांगलादेशला हा सामना जिंकण्यासाठी १४४ धावांची गरज होती. बांगलादेशकडून डावाची सुरूवात करताना परवेज हुसेन इमोन आणि तांझीद हसन तमीम या जोडीने पहिल्या विकेटसाठी अवघ्या २४ धावा जोडल्या. परवेज १९ तर तांझीद अवघ्या १४ धावा करून माघारी परतला.संघाचा कर्णधार लिटन दास शेवटपर्यंत उभा राहिला. त्याने तौहीद हृदॉयसोबत मिळून १०० हून अधिक धावांची भागीदारी केली आणि बांगलादेशला स्पर्धेतील पहिला विजय मिळवून दिला. लिटन दासने या डावात फलंदाजी करताना ५९ धावांची खेळी केली. तर तौहीद हृदॉय ३५ धावांवर नाबाद राहिला. यासह बांगलादेशने हा सामना ७ गडी राखून आपल्या नावावर केला. या विजयासह बांगलादेशने या स्पर्धेतील पहिल्या विजयाची नोंद केली आहे. यासह बांगलादेशने गुणतालिकेत २ गुणांची कमाई केली आहे. तर हाँगकाँगचा या स्पर्धेतील सलग दुसरा पराभव ठरला आहे. बांगलादेशचा पुढील सामना १३ सप्टेंबरला श्रीलंकेविरूद्ध होणार आहे. तर आपल्या पहिल्या विजयाच्या प्रतिक्षेत असलेला हाँगकाँगचा संघ देखील १५ सप्टेंबरला होणाऱ्या पुढील सामन्यात श्रीलंकेचा सामना करताना दिसेल.या सामन्यात बांगलादेश संघाचा कर्णधार लिटन दासने नाणेफेक जिंकून प्रथम गोलंदाजी करण्याचा निर्णय घेतला.

### बांगलादेशसमोर१४४ धावांचे आव्हान

पुढील सामन्यात श्रीलंकेचा सामना करताना दिसेल.आशिया चषक २०२५ स्पर्धेला दमदार सुरूवात झाली आहे. स्पर्धेतील तिसऱ्या सामन्यात हाँगकाँग आणि बांगलादेश हे दोन्ही संघ आमनसामने आले होते.या सामन्यात हाँगकाँगने बांगलादेशसमोर विजयासाठी १४४ धावांचे आव्हान ठेवले होते. या आव्हानाचा पाठलाग करताना बांगलादेशने ७ गडी राखून विजयाची नोंद केली आहे.

हाँगकाँगकडून प्रथम फलंदाजी करण्यासाठी आलेल्या झीशान अलीने ३० धावांची खेळी करून दमदार सुरूवात करून दिली. अंशुमन राठने ४ धावा केल्या. त्यानंतर बाबर हयातने १४ धावांचे योगदान दिले. मधली फळी सांभाळताना निझाकत खानने ४० चेंडूंचा सामना करत सर्वाधिक ४२ धावांची खेळी केली. तर कर्णधार यासीम मुर्तजाने २८ धावांचे योगदान दिले. यासह हाँगकाँगला २० षटकांअखेर ७ गडी बाद १४३ धावा करता आल्या.बांगलादेशला हा सामना जिंकण्यासाठी १४४ धावांची गरज होती. बांगलादेशकडून डावाची सुरूवात करताना परवेज हुसेन इमोन आणि तांझीद हसन तमीम या जोडीने पहिल्या विकेटसाठी अवघ्या २४ धावा जोडल्या. परवेज १९ तर तांझीद अवघ्या १४ धावा करून माघारी परतला.संघाचा कर्णधार लिटन दास शेवटपर्यंत उभा राहिला. त्याने तौहीद हृदॉयसोबत मिळून १०० हून अधिक धावांची भागीदारी केली आणि बांगलादेशला स्पर्धेतील पहिला विजय मिळवून दिला. लिटन दासने या डावात फलंदाजी करताना ५९ धावांची खेळी केली. तर तौहीद हृदॉय ३५ धावांवर नाबाद राहिला. यासह बांगलादेशने हा सामना ७ गडी राखून आपल्या नावावर केला. या विजयासह बांगलादेशने या स्पर्धेतील पहिल्या विजयाची नोंद केली आहे. यासह बांगलादेशने गुणतालिकेत २ गुणांची कमाई केली आहे. तर हाँगकाँगचा या स्पर्धेतील सलग दुसरा पराभव ठरला आहे. बांगलादेशचा पुढील सामना १३ सप्टेंबरला श्रीलंकेविरूद्ध होणार आहे.

# आशिया चषकात मिळाली नाही संधी!

## ‘हा’ भारतीय खेळाडू आता दुसऱ्या देशात जाऊन खेळणार

। नवी दिल्ली ।
वृत्तसंस्था : महाईन्यूज

**आशिया चषक २०२५ स्पर्धेला सुरूवात झाली आहे. भारतीय संघाने पहिल्या सामन्यात यूएईचा दमदार पराभव केला. भारतीय संघाचा पुढील सामना येत्या १४ सप्टेंबरला पाकिस्तानविरूद्ध होणार आहे. या स्पर्धेसाठी राखीव खेळाडू म्हणून निवड झालेल्या वॉशिंग्टन सुंदरने काऊंटी चॅम्पियनशिप स्पर्धेत हॅम्पशायर संघाकडून खेळण्याचा निर्णय घेतला आहे.**




तो हंगामातील शेवटच्या दोन सामन्यात समरसेट आणि सरेविरूद्ध होणाऱ्या सामन्यात हॅम्पशायर संघाकडून खेळताना दिसणार आहे. हॅम्पशायरने सोशल मीडियावर पोस्ट शेअर करत याबाबत माहिती दिली आहे. वॉशिंग्टन सुंदरला इंग्लंडविरूद्ध झालेल्या भारतीय संघात संधी दिली गेली होती. या मालिकेत त्याच्या फलंदाजीचा बोलबाला पाहायला मिळाला होता. या मालिकेत त्याने ४७ च्या सरासरीने फलंदाजी करताना २८४ धावा केल्या होत्या. या मालिकेतील चौथ्या कसोटीत त्याने दमदार शतक झळकावलं होतं. हे त्याच्या

### दोन्ही सामन्यांमध्ये तगडं आव्हान

.ज्यात १३ कसोटी सामन्यांचा समावेश आहे. यादरम्यान त्याने १८०० हून अधिक धावा केल्या आहेत. गोलंदाजी करताना त्याने ९१ गडी बाद केले आहेत. यादरम्यान ५९ धावा करून ७ गडी बाद ही त्याची सर्वोत्तम कामगिरी आहे.वॉशिंग्टन सुंदरला हॅम्पशायर संघाकडून २ सामने खेळण्याची संधी मिळणार आहे. वॉशिंग्टन सुंदरसाठी पुढील दोन्ही सामन्यांमध्ये तगडं आव्हान असणार आहे.

कसोटी कारकिर्दीतील पहिलं शतक ठरलं. ही कामगिरी पाहून त्याला काऊंटी चॅम्पियनशिप खेळण्याची संधी दिली गेली आहे.वॉशिंग्टन सुंदर हा दुसऱ्यांदा काऊंटी चॅम्पियनशिप स्पर्धा खेळताना दिसणार आहे. याआधी तो २०२२ मध्ये लंकाशायर संघाकडून खेळताना दिसून आला होता. या संघाकडून तो वनडे कप खेळताना दिसून आला होता.वॉशिंग्टन सुंदरआधी तिलक वर्मांचा हॅम्पशायर संघात समावेश करण्यात आला होता. वॉशिंग्टन सुंदरच्या कामगिरीबद्दल सांगायचं झालं, तर त्याला प्रथम श्रेणी क्रिकेटमध्ये ४० सामने खेळण्याची संधी मिळाली आहे

स्मार्ट PCMC SMART CITY
महाईन्यूज™
ePaper
epaper.mahaenews.com
। शुक्रवार ।
। दि. 12 सप्टेंबर 2025।
पिंपरी-चिंचवड, मावळ आवृत्ती

### विधिवत मंत्रोच्चार आणि पूजन करून श्री गणेशाची स्थापना

# संत साई स्कूलमध्ये 'बाप्पा मोरया'!

## शिक्षण विश्व: संत साई स्कूलमध्ये मोठ्या उत्साहात गणेशोत्सव साजरा

। पिंपरी चिंचवड ।
प्रतिनिधी : महाईन्यूज

**भोसरी येथील संत साई इंग्लिश मीडियम हायस्कूलमध्ये याही वर्षी पारंपरिक ढोल-ताशांच्या गजरात, टाळ-मृदुंगासह पारंपरिक वाद्यांच्या साथीत मोठ्या उत्साहात गणेशोत्सव साजरा करण्यात आला. "वक्रतुंड महाकाय, सूर्यकोटि समप्रभ" या मंगल श्लोकाच्या घोषात ओमकार स्वरूप गणपती बाप्पांचे शाळेत आगमन झाले..**



संस्थेचे संस्थापक अध्यक्ष शिवलिंग ढवळेश्वर यांच्या हस्ते विधिवत मंत्रोच्चार आणि पूजन करून श्री गणेशाची स्थापना करण्यात आली. यावेळी गणेशमूर्तीच्या सजावटीसाठी विशेष मेहनत घेण्यात आली होती. शाळेतील शिक्षक, विद्यार्थी, पालक आणि माजी विद्यार्थ्यांच्या उपस्थितीत कार्यक्रमाने उत्साहाचे वातावरण निर्माण केले.

संत साई इंग्लिश स्कूल ही केवळ शिक्षण क्षेत्रातच नव्हे, तर क्रीडा, सांस्कृतिक आणि अध्यात्मिक क्षेत्रातही आपला ठसा उमठवणारी एक प्रतिष्ठित संस्था आहे. शाळेने दरवर्षीप्रमाणे यंदाही पाच दिवस गणेशोत्सवाचे आयोजन केले. या उत्सवाचे विशेष वैशिष्ट्य म्हणजे दररोज सकाळच्या आरतीसाठी शाळेच्या माजी विद्यार्थ्यांना आमंत्रित करून त्यांच्या हस्ते आरती केली जाते.

शाळेतल्या विद्यार्थी सायली नितीन शिंदे, पायल मसरकल, नेहा मुनडकर, शुभम बिरादार, प्रगती बालघरे, प्रसाद सोमवंशी, प्रिया बारणे, अश्विनी दफळ, विजय तनपुरे यांच्या हस्ते आरती पार पडली. प्रत्येक दिवशी आरतीनंतर माजी विद्यार्थ्यांचा सत्कार शाल आणि श्रीफळ देऊन करण्यात आला. माजी विद्यार्थ्यांनी आपल्या मनोगतात शाळेबद्दल कृतज्ञता व्यक्त करत शिक्षकांच्या योगदानाचे मनपूर्वक स्मरण केले.

उत्सवाच्या निमित्ताने शाळेने सामाजिक भान ठेवत गरजू संस्थांना मदत केली. तसेच, गणेश अथर्वशीर्ष पठण, गणपती स्तोत्र आणि वक्तृत्व स्पर्धांचे आयोजन करण्यात आले. पाचव्या दिवशी विसर्जन सोहळ्यादिवशी संस्थेचे अध्यक्ष शिवलिंग ढवळेश्वर, संचालिका सुनीता ढवळेश्वर आणि विश्वस्त ओमप्रकाश मसरकल यांच्या उपस्थितीत आरती पार पडली.

यावेळी ढवळेश्वर यांनी संस्कारमूल्य शिक्षणाबरोबरच आरोग्यदायी जीवनशैलीचे महत्त्व अधोरेखित केले. बुद्धीची देवता, चौदा विद्या आणि चौसष्ट कलांचे अधिपती श्री गणेशाकडे सर्वांसाठी सुख, शांती, समृद्धी आणि विद्येचे वरदान मागण्यात आले. कार्यक्रमाचा समारोप ढोल-ताशांच्या गजरात, "गणपती बाप्पा मोरया", "पुढच्या वर्षी लवकर या" अशा घोषणांनी झाला. स्वयंसेवक विद्यार्थ्यांनी आणि उपस्थितांनी भावनिक वातावरणात गणपती बाप्पांना निरोप दिला. या सोहळ्यात शाळेच्या उपमुख्याध्यापिका रूपाली खोल्लम, संजय अनार्थे, स्वाती मोघे, भारती ढवळेश्वर, आरती मुट्टगीशेट्टर, कोमल वाबळे, रिया पोतदार तसेच शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी, पालक उपस्थित होते.

---

# ३८ हजार चौरस फुटांवरील बांधकामांवर बुलडोझर फिरवला!.

## वाकड–ताथवडे परिसरात पालिकेची अतिक्रमण निर्मूलन मोहीम

। पिंपरी चिंचवड । प्रतिनिधी : महाईन्यूज

**पिंपरी चिंचवड महापालिकेच्या झोपडपट्टी निर्मूलन व पुनर्वसन विभागाने विकास आराखड्यात आरक्षित असलेल्या १८ मीटर रस्त्यावरील ४३ झोपड्यांचे सुमारे ३८ हजार ७५० चौरस फुटांवरील बांधकाम अतिक्रमण विभागांच्या वतीने हटवण्यात आले.**



> **पिंपरी चिंचवड महापालिकेच्या विकास योजना आणि सार्वजनिक सुविधांच्या अंमलबजावणीस अडथळा ठरणाऱ्या अनधिकृत बांधकामांवर कठोर कारवाई करण्यात येत आहे. वाकड-ताथवडे परिसरात १८ मीटर रस्त्याला अडथळा ठरणारे अतिक्रमण हटवण्यात आले आहे. सदर रस्त्याचे काम त्वरित सुरू करण्यात येत आहे. त्यामुळे या परिसरातील वाहतूक कोंडी कमी होण्यास मदत होईल.**
> **- शेखर सिंह, आयुक्त तथा प्रशासक, पिंपरी चिंचवड महापालिका**

पिंपरी चिंचवड महापालिका आयुक्त तथा प्रशासक शेखर सिंह, अतिरिक्त आयुक्त प्रदीप जांभळे पाटील, शहर अभियंता मकरंद निकम यांच्या मार्गदर्शनाखाली तसेच झोपडपट्टी निर्मूलन व पुनर्वसन विभागाचे उपायुक्त अण्णा बोदडे, मुख्यालय अतिक्रमण विभागाचे सहाय्यक आयुक्त अतुल पाटील यांच्या अधिपत्याखाली करण्यात आलेल्या या कारवाईत कार्यकारी अभियंता सुनिल शिंदे,राजेंद्र शिंदे यांच्यासह अधिकारी व कर्मचारी सहभागी झाले होते.

पिंपरी चिंचवड महापालिकेच्या वतीने काळाखडक, वाकड येथील मिळकतीवरील झोपडपट्टी पुनर्वसन योजनेस लागून असलेल्या मंजूर विकास योजनेतील भूमकर चौक, वाकड येथील ताथवडे हद्दपर्यंत १८ मी. रस्त्याने बाधित होणाऱ्या २०० मीटर लांब व १८ मीटर रुंद असलेल्या सुमारे ३८ हजार ७५० चौरस फूट क्षेत्रामध्ये ४३ झोपड्या निष्कासित करण्यात आल्या. ड क्षेत्रीय कार्यालय स्थापत्य, झोपडपट्टी निर्मूलन व पुनर्वसन विभाग, प्रशासन व स्थापत्य, शहरी दळणवळण विभाग, नगररचना विभाग, विद्युत विभाग, अतिक्रमण विभाग, अग्निशामक व महाराष्ट्र सुरक्षा बलाचे जवान यांनी संयुक्तपणे ही कारवाई करण्यात आली. या कारवाईमध्ये सदर रस्ता रुंदीकरणातील अनधिकृत झोपड्या,वीट बांधकाम ड क्षेत्रीय कार्यालय स्थापत्य विभागाच्या ४ पोकलेन्ड, ४ जेसीबी, ६ डंपर व २० मजुरांच्या सहाय्याने पाडण्यात आले.

Pune District Education Association's


# Seth Govind Raghunath Sable College of Pharmacy

## Saswad, Pune - 412301

D.Pharm/B.Pharm/M.Pharm/Ph.D.

Pharmacy Council of India | SPPU Affiliation | NAAC Accreditation | Maharashtra State Board of Technical Education

## Facilitation & Verification Center for F. Y. B.Pharm, F.Y.M.Pharm,and Direct S.Y.B.Pharm Admission 2025–26



### Admission Schedule for F.Y.B.Pharm

| | |
|---|---|
| Online Registration & Document Upload | 07 – 21July 2025 (10:00AM-5:00PM) |
| Document Verification & Form Confirmation (Physical Scrutiny at FC) | 08 – 22 July 2025 (10:00AM-5:00 PM) |
| Display of Provisional Merit List | 25 July 2025 |
| Grievance Submission (Online / at FC) | 26– 28 July 2025 (10:00AM-5:00 PM) |
| Final Merit List | 31 July 2025 |

**Your Trusted Facilitation Centre!**

**FC Code 6372**

Important Note:

- Bring all original + Xerox copies of documents
- Late registrations after 14 July are for Non-CAP seats only

## "Your First Step Towards a Bright Pharmacy Career!"

**Confirm Your Application Now!**



Visit Us for Physical Scrutiny

PDEA's Seth Govind Raghunath Sable College of Pharmacy, Saswad

Timings: 10:00 AM – 5:00 PM (including Saturday & Sunday)

Contact: Dr. Nilesh Bhosale – 9860503549

College of Pharmacy
Saswad, Pune - 412301
D.Pharm/B.Pharm/M.Pharm/Ph.D.

PDEA

Pharmacy Council of India
SPPU Affiliation
NAAC Accreditation
Maharashtra State Board of Technical Education

Facilitation & Verification Center for
F. Y. B.Pharm, F.Y.M.Pharm,and
Direct S.Y.B.Pharm Admission 2025–26

Admission Schedule for
F.Y.B.Pharm

| | |
|---|---|
| Online Registration & Document Upload | 07 – 21July 2025 (10:00AM-5:00PM) |
| Document Verification & Form Confirmation (Physical Scrutiny at FC) | 08 – 22 July 2025 (10:00AM-5:00 PM) |
| Display of Provisional Merit List | 25 July 2025 |
| Grievance Submission (Online / at FC) | 26– 28 July 2025 (10:00AM-5:00 PM) |
| Final Merit List | 31 July 2025 |



Your Trusted Facilitation Centre!

FC Code 6372

Important Note:
- Bring all original + Xerox copies of documents
- Late registrations after 14 July are for Non-CAP seats only

"Your First Step Towards a Bright Pharmacy Career!"

Confirm Your



Visit Us for Physical Scrutiny

PDEA's Seth Govind Raghunath Sable College of Pharmacy, Saswad


Express
Media Enterprises
Professional Live set up with live drone available..
• Documentary
• Weddings
• Drone
• Motion Graphics
• Testimonials
• Tutorial videos
• Product Videos
• Animation
• Social Media Content
• Promotional Videos
• Real Estate
• Corporate
• Advertising
• Events
PUNE
Contact: 9657767000/9370493922/9664188046